दैनिक - लोकमत
दि. 18/03/2020

## विद्यार्थ्यांना निरोप

अंबड : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयातील बी. कॉम तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पियूष गोयल, प्रा. चंद्रसेन कोठावळे, प्रा. सुरेंद्र पडगिलवार, प्रा. जितेंद्र भालेराव, प्रा. रवीराज कटारे, प्रा. योगेश कटारे, प्रा. शंकर तिकांडे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक - लोकमत
दि. 12/02/2021

## सीए परीक्षेत विद्यार्थिनींचे यश



अंबड : येथील मत्स्योदरी महाविद्यालयातील विद्यार्थिनी मनीषा रामेश्वर उबाळे व दिशा बजरंग जहागीर यांनी सीए परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल डॉ. शिवशंकर घुमरे यांनी विद्यार्थिनींचा सत्कार केला. या प्रसंगी पर्यवेक्षक प्रा. पांडुरंग काळे, क्रीडा प्रमुख डॉ. प्रशांत तौर, कार्यालयीन अधीक्षक पांडुरंग गाहिरे, प्रा. दीपक राखुंडे, प्रा. राजेंद्र पठाडे, प्रा.गणेश गुंजाळ, बालासाहेब उगले आदींची उपस्थिती होती.

Page No.:

Date : / /

दैनिक - लोकमत

दि. 15/02/2021

## 'मत्स्योदरी'त उबाळे, जहांगीड यांचा सत्कार

**अंबड :** येथील मत्स्योदरी महाविद्यालयातील बी. कॉम. प्रथम वर्षातील मनीषा उबाळे व दिशा जहांगीड यांनी सीए फाऊंडेशन परीक्षेत यश संपादित केले आहे. याबद्दल त्यांचा प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. पांडुरंग काळे, प्रा. प्रशांत तौर, प्रा. दीपक राखुंडे आदींची उपस्थिती होती.

दैनिक - सकाळ

दि. 03/03/2021

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व्याख्यानमाला

**अंबड :** शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाइन व्याख्यानमालेस नुकताच प्रा. डॉ.उमेश मोगले यांच्या हस्ते प्रारंभ झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शिवशंकर घुमरे होते. व्याख्यानमालेत प्रा.डॉ.दत्ता ढाले यांनी संवाद साधला. यावेळी प्रा. डॉ. मिलिंद पंडित, डॉ.दिगंबर भुतेकर,डॉ.शकुंतला म्हस्के, प्रा. दीपक मोरे व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. दत्ता घोगरे यांनी केले. डॉ. फारुक शेख यांनी आभार मानले. व्याख्यानमालेची सांगता गुरुवारी (ता. चार) होणार आहे.

दैनिक - सकाळ
दि. 20/02/2021



अंबड: शहरातील पाचोडनाका येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातील कार्यक्रमास उपस्थित माजी आमदार शिवाजीराव चोथे, बाबासाहेब इंगळे, कुमार रुपवते आदी. (दुसऱ्या छायाचित्रात) अंबडच्या मत्स्योदरी महाविद्यालयातील कार्यक्रमास उपस्थित प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे, प्रा.दिगंबर भुतेकर आदी. (तिसऱ्या छायाचित्रात) आलमगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना.

दैनिक- लोकमत

दि. 24/02/2021



करताना सरपंच सोपान नाईकवाडे, उपसरपंच गौतम हिवाळे, शंकर नाईकवाडे व इतर आदी. दुसऱ्या छायाचित्रात दावलवाडी ग्रामपंचायतीत अभिवादन करताना उपसरपंच सुभाष जगताप, गणेश जगताप, उत्तम पवार, अंबड शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात प्रतिमापूजन करून अभिवादन करताना प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे, पांडुरंग गहिरे, प्रा. दिगंबर भुतेकर, प्रा. विनोद जाधव, प्रा. प्रकाश आर्कोलकर व इतर.

दैनिक सकाळ
दि. 25/02/2021



अंबड : पीएच.डी. मिळाल्याबद्दल प्रा.चंद्रसेन कोठावळे यांचा सत्कार करताना पालकमंत्री राजेश टोपे व अन्य.

## प्रा.चंद्रसेन कोठावळे यांना पीएच. डी.

**अंबड, ता.२४ :** मत्स्योदरी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा.चंद्रसेन कोठावळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी. प्रदान केली. त्यांनी प्रा.डॉ. दादासाहेब जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध सादर केला. यानिमित्त त्यांचे पालकमंत्री राजेश टोपे, प्राचार्य डॉ.भागवतराव कटारे, प्राचार्य डॉ.शिवशंकर घुमरे आदींनी अभिनंदन केले.

दैनिक- दिव्यमराठी
दि. 26/02/2021

## प्रा.राजेंद्र दखणे यांच्या शैक्षणिक यूट्यूब चॅनलला अधिकृत मान्यता

**प्रतिनिधी | अंबड**

कोरोना या जागतिक महामारीच्या संकटात इ. शिक्षणाद्वारे अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयातील प्रा. राजेंद्र दखणे यांच्या शैक्षणिक यूट्यूबचॅनला अधिकृत, प्रमाणित मान्यता देण्यात आल्याने त्यांचा मस्त्योदरी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे, मॉडर्न कॉलेज घनसावंगीचे प्राचार्य डॉ. विश्वासराव कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोरोना या जागतिक महामारीच्या संकटात इ.शिक्षणाद्वारे सदरील युट्युबचॅनेलचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत समाधानकारक असून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्याचा जास्तीत-जास्त फायदा होईल, असे प्राचार्य डॉ. घुमरे म्हणाले. तर शैक्षणिक विषयातील दर्जेदार व्हिडीओचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी फायदा होत असल्याचे प्राचार्य डॉ. कदम यांनी सांगितले. यावेळी प्रा. विठ्ठलराव रायमूळे, प्रा.ज्ञानेश्वर उबाळे, प्रा. देविदास जंगले, प्रा.पांडुरंग काळे, प्रा.पोपटराव सुरासे आदींची उपस्थिती होती.

दैनिक- सकाळ
दि. २६/०२/२०२१

# डॉ. घुमरे यांच्याकडून सापाला जीवदान

**अंबड, ता.२५ (बातमीदार) :** शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयाच्या जवळ आढळलेल्या सापाला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सर्पमित्र डॉ.शिवशंकर घुमरे यांनी पकडून सुरक्षित स्थळी सोडून देत जीवदान दिले.

महाविद्यालयाच्या परिसरात साप आढळल्यानंतर सर्पमित्र डॉ.घुमरे यांनी त्यास पकडले. त्यानंतर एका पोत्यात टाकून सुरक्षित स्थळी नेऊन सोडून दिले. त्यामुळे सापाला जीवदान मिळाले. पर्यावरण रक्षणासाठी प्राचार्य घुमरे विविध उपक्रम सातत्याने घेतात. महाविद्यालयात विविध वृक्षाची लागवड व संगोपन केले आहे. याचबरोबर पक्ष्यांसाठी झाडाच्या फांद्यावर दाना, पाण्याची व्यवस्था केली. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन डॉ.घुमरे यांनी केले आहे.




**अंबड : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सर्पमित्र डॉ.शिवशंकर घुमरे यांनी परिसरात पकडलेला साप.**

दैनिक - सकाळ
दि. 06/3/2021

# 'मत्स्योदरी'त ऑनलाइन व्याख्यानमालेची सांगता

अंबड, ता. ५ (बातमीदार) : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑनलाइन व्याख्यानमालेची गुरुवारी ( ता.चार ) सांगता झाली. या व्याख्यानमालेत पुणे, सांगली, धुळे, अकोला, बीड, इस्लामपूर येथील प्राध्यापकांनी विचार मांडले.

समारोपात प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले, की ही व्याख्यानमाला विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण करण्यास लाभदायक होईल. विद्यार्थ्यांची नेहमीच शोधक नजर असली पाहिजे, यातून संशोधनाची अंगी गोडी लागते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ.शकुंतला मस्के यांनी केले. प्रा.डॉ. दत्ता घोगरे यांनी आभार मानले.

दैनिक- सकाळ
दि. 9/03/2021

# सक्षम व्हा, शिक्षणातून यशोशिखर गाठा

## अंबडला महिलादिनानिमित्त वक्त्यांचे विद्यार्थिनींना आवाहन




**अंबड :** शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात सोमवारी महिला दिनाच्या कार्यक्रमात सहभागी प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे, ॲड.आशा गाडेकर, योगिता टकले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थिनी आदी.

**अंबड,ता.८ (बातमीदार) :** समाजात वावरताना कायद्याचे ज्ञानही अवगत असले पाहिजे. शिक्षणाशिवाय समाजात परिवर्तन नाही. त्यामुळे विद्यार्थिनींनी सक्षम व्हावे, शिक्षणातून यशोशिखर गाठावे, असे आवाहन वक्त्या ॲड.आशा गाडेकर, योगिता टकले यांनी केले.

मत्स्योदरी महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त घिनच्या वतीने सोमवारी (ता. आठ) कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे होते. कार्यक्रमात योगिता टकले म्हणाल्या, की शिक्षणातूनच समाजात क्रांती घडविता येते. सावित्रीच्या लेकींनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. त्याशिवाय समाजात परिवर्तन घडणार नाही. ॲड.आशा गाडेकर म्हणाल्या, की समाजात वावरताना स्वसंरक्षणाबाबत महिला, युवतींनी सक्षम असले पाहिजे, ती आता काळाची गरज आहे. महिलांसाठी विविध कायदे आहेत, त्या कायद्यांचे ज्ञान अवगत असले पाहिजे. निर्णय घेण्याची क्षमता असायला हवी, असे त्यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ. घुमरे म्हणाले की, महिलांनी आज सर्वच ठिकाणी आपला ठसा उमटवला आहे. त्या विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने योगदान देत आहेत. समाजात अनेक महिलांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास घडविला आहे.

कार्यक्रमाला गंगासागर जाधव, प्रा.डॉ.जानकी कुर्तडीकर, प्रा. सुशिला बचाटे, प्रा.मनीषा गायकवाड, प्रा.शीतल पालकर, प्रा.अनिता पैठणे, मंदा दोरखे, प्रा. डॉ. दिगंबर भुतेकर, प्रा. पोपटराव सुरासे, प्रा.ज्ञानेश्वर उबाळे, प्रा. दीपक राखुंडे, प्रा.प्रशांत तौर, प्रा.रवींद्र पैठणे, प्रा.संदीप गढेकर, प्रा.पांडुरंग काळे, प्रा. प्रकाश अकोलकर, प्रा.डॉ.गणेश निवारे, प्रा. रवींद्र तिकांडे, पांडुरंग गहिरे,सुनील सोनवणे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. विद्या दिवटे यांनी केले. प्रा. डॉ. सुषमा प्रधान यांनी आभार मानले.

दैनिक- लोकमत
दि. 13/3/2021



## मत्सोदरी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती

अंबड : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात स्व. यशवंतराव चव्हाण यांना शुक्रवारी जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले.स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या समतोल विकासाचे ध्येय बाळगले. प्रगत आणि पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आधुनिक विचारांची पायाभरणी केली. यावेळी प्राचार्य. डॉ. शिवशंकर घुमरे, डॉ. विनोद जाधव, डॉ. दिगंबर भुतेकर, पांडुरंग गहिरे, डॉ. रामनाथ सांगुळे, प्रा. रवी पैठणे, प्रा. गाडेकर व सुनील सोनवणे, गणेश राठोड उपस्थित होते.

दैनिक - लोकमत
दि. 23/03/2021

## उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर उबाळे

लोकमत न्यूज नेटवर्क

अंबड : येथील मत्स्योदरी महाविद्यालयाचे प्रा. ज्ञानेश्वर उबाळे यांची शिक्षणशात्र परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.



महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणशास्त्र परिषदेची राज्य कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असून यात प्रा. ज्ञानेश्वर उबाळे यांचे शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक योगदान, विद्यार्थी हित व मूल्यशिक्षण देण्यासाठी केलेले प्रयत्न या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांची निवड केली आहे. निवडीबद्दल त्यांचे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनिषा टोपे, कोषाध्यक्ष सुधाकरराव चिमणे, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. बी. आर. गायकवाड, प्राचार्य डॉ . राजेंद्र गायकवाड, प्राचार्य डॉ . शिवशंकर घुमरे यांनी प्रा.उबाळे यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक - सकाळ
दि. 23/03/2021

## प्रा.ज्ञानेश्वर उबाळे यांची निवड



ज्ञानेश्वर उबाळे

**अंबड :** महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण परिषदेच्या उपाध्यक्षपदी प्रा. ज्ञानेश्वर उबाळे यांची निवड करण्यात आली आहे. परिषदेची राज्य कार्यकारिणी नुकतीच घोषित झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे पालकमंत्री व मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, संस्थेच्या सचिव तथा सिनेट सदस्या मनीषा टोपे, कोषाध्यक्ष सुधाकरराव चिंमणे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बाबासाहेब गायकवाड, प्राचार्य डॉ. भागवतराव कटारे, डॉ.राजेंद्र गायकवाड, डॉ.शिवशंकर घुमरे आदींनी अभिनंदन केले.

दैनिक - सकाळ
दि. 03/04/2021

## सुधाकरराव चिमणे यांना श्रद्धांजली



सुधाकरराव चिमणे

**अंबड :** मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष तथा कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याचे जनसंपर्क अधिकारी सुधाकरराव चिमणे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना अंबड शहरातील मत्स्योदरी महाविद्यालय व मत्स्योदरी विद्यालयाच्या वतीने गुरुवारी (ता.एक) श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मत्स्योदरी महाविद्यालय झालेल्या शोकसभेला प्राचार्य डॉ.शिवशंकर घुमरे,प्रा.चंद्रसेन कोठावळे,प्रा.डॉ.दिगंबर भुतेकर,प्रा. डॉ.प्रशांत तौर,प्रा.पांडुरंग काळे,प्रा.ज्ञानेश्वर उबाळे,प्रा.दीपक राखुंडे,प्रा. डॉ.संदीप गढेकर,प्रा. रवींद्र पैठणे,प्रा.प्रकाश अकोलकर प्रा.डॉ.दत्ता घोगरे,पांडुरंग गहिरे,सुनील सोनवणे आदी उपस्थित होते. मत्स्योदरी विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक पांडुरंग घोगरे, उपमुख्याध्यापक देवीदास माने, भगवान मुळे, भगवान नाटकर, नितीन खरात,विष्णू काळे, आनंदा पेनक,भगवान उगले, प्रल्हाद रेडे, भारत मरकड, कल्याण चेपटे, गौतम मोरे, आशा नागे,योगिता गवारे,मीरा बोडखे,बबन कारके आदींनी

दैनिक - सकाळ
दि. 12/04/2021

## » सजग नागरिक म्हणताहेत...



“कोरोनाचे संकट परतावून लावणे ही केवळ शासन-प्रशासनाची जबाबदारी नाही, यासाठी जनतेच्या सहकार्याचीही गरज आहे. मास्कचा वापर, डिस्टन्सिंगचे पालन करावे. प्रत्येकाने स्वतःला नियम घालून द्यावेत. सकारात्मक विचार ठेवावा. सध्या जनजीवन विस्कळीत असले तरी भविष्यात ते निश्चितपणे सुधारणार आहे, याची खात्री बाळगावी. तूर्तास कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने खबरदारी घ्यावी.

– प्राचार्य शिवशंकर घुमरे
शिक्षणतज्ज्ञ, अंबड

दैनिक - लोकमत
दि. 15/4/2021

## कला, वाणिज्य महाविद्यालय, अंबड



अंबड : शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. दिगंबर भुतेकर, पांडुरंग गहिरे, प्रा. इंगळे, प्रा. दीपक राखुंडे आदींची उपस्थिती होती.

दैनिक - लोकमत
दि. 15/4/2021

रासेयो : प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा पुढाकार

# पक्ष्यांसाठी दाणा- पाण्याची सोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**अंबड** : येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण शास्त्र विभागाचे वतीने महाविद्यालय परिसरात पक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची सोय करण्यात आली आहे.

या महाविद्यालयाच्या परिसरात दोन हजार झाडे असून, यामध्ये विविध प्रकारच्या देशीविदेशी वनस्पतींसह औषधी वनस्पतींचाही समावेश आहे. या झाडांवर येऊन बसणाऱ्या पक्ष्यांची संख्या मोठी आहे. या पक्ष्यांची चारा-पाण्यासाठी भटकंती होऊ नये, म्हणून प्राचार्य डॉ.शिवशंकर घुमरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाविद्यालय परिसरातील झाडांवर पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी सोय केली. उपक्रमासाठी प्राचार्य डॉक्टर शिवशंकर घुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. दादासाहेब जोगदंड, डॉ.राम रौनैकर, प्रा.डॉ.विनोद जाधव, प्रा.डॉ.दिगंबर भुतेकर, प्रा.सदाशिव शिनकर, प्रा.पोपटराव सुराशे, प्रा.ज्ञानेश्वर उबाळे, प्रा.पांडुरंग काळे, प्रा.संपत पवार, पांडुरंग गहिरे आदींनी पुढाकार घेतला.



महाविद्यालय परिसरात विविध प्रकारचे वृक्ष असून, या वृक्षांवर बसणाऱ्या पक्ष्यांची संख्या मोठी आहे. उन्हाळ्यात या पक्ष्यांची दाणा- पाण्याअभावी गैरसोय होऊ नये, यासाठी महाविद्यालयाच्या वतीने गत अनेक वर्षांपासून हा उपक्रम राबविला जात आहे. सर्वसामान्य नागरिकांनीही अशा प्रकारचे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

- डॉ.शिवशंकर घुमरे, प्राचार्य

दैनिक - सकाळ
दि. 15/4/2021



अंबड : मत्स्योदरी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्रा.डॉ.दिगंबर भुतेकर, प्रा. दीपक राखुंडे, प्रा.अनिल इंगळे, पांडुरंग गहिरे आदी

दैनिक सकाळ
दि.१५।४।२०२१

**मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड :** येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा.डॉ.दिगंबर भुतेकर, प्रा.डॉ.राम रौनेकर, प्रा.दीपक राखुंडे, प्रा.अनिल इंगळे, प्रा. पांडुरंग काळे, प्रा.रवींद्र पैठणे, प्रा.प्रकाश अकोलकर, प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, पांडुरंग गहिरे, अरुण लांडगे, गणेश राठोड, सुनील सोनवणे, संजय पावसे आदींची उपस्थिती होती

दैनिक सकाळ
दि.28/4/2021

# अंबड शहरातील विद्यार्थ्यांचे एमबीबीएसच्या परीक्षेत यश

**अंबड,ता.२७ :** शहरातील विविध विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस. च्या अंतिम वर्षात घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये मयुरी महावीर अन्नदाते हिने ९०० पैकी ६६३ गुण मिळविले. गोरक्ष रामेश्वर कोठेकर याने ९०० पैकी ६४३ गुण तर विजया रुघे हिने ९०० पैकी ६३३ गुण मिळविले.


मयूरी अन्नदाते


गोरक्ष कोठेकर


विजया रुघे

या विद्यार्थ्यांचे पालकमंत्री राजेश टोपे, मनिषा टोपे, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. बाबासाहेब गायकवाड,. डॉ. भागवतराव कटारे, डॉ. शिवशंकर घुमरे, मुख्याध्यापक पांडुरंग घोगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

Page No.:
Date: / /

दैनिक लोकमत
दि. 09/06/2021


पालकांमध्ये संभ्रमावस्था : विद्यार्थ्यांचीही चिंता वाढली

# बारावी परीक्षा रद्द; पुढील प्रवेश कसे होणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** कोरोनामुळे यापूर्वी आकरावीपर्यंतच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. आता बारावीच्या परीक्षाही शासनाकडून रद्द करण्यात आल्या आहेत. परंतु, त्याबाबतचे परिपत्रक आणि पुढील प्रवेश प्रक्रिया कशी करायची, याचीही स्पष्ट माहिती शिक्षण विभागाकडे आलेली नाही. त्यामुळे परीक्षा रद्द झाली तरी पुढील प्रवेश प्रक्रियेचे काय, याची चिंता पालकांसह विद्यार्थ्यांना सतावत आहे.

गत दीड वर्षापासून कोरोनाचा कहर जिल्ह्यात सुरू आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावात शिक्षकांनी ऑनलाइन पध्दतीने मुलांना शिक्षण दिले. शहरी भागातील मुलांना सुरळीत शिक्षण मिळाले असले तरी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण घेताना अडचणींचा सामना करावा लागला. काही काळ ऑफलाईन शिक्षण मिळाले. परंतु, ते ही ५० टक्के उपस्थितीवर करण्यात आले. कोरोनामुळे परीक्षा घ्याव्या की नाही, याचाही गोंधळ सुरू होता. परंतु, शासनाने वाढता प्रादुर्भाव आणि संभाव्य तिसरी लाट पाहता बारावीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. वार्षिक प्रगती पडताळून मुलांना गुण दिले जाणार आहेत. परंतु, पुढील प्रवेश प्रक्रिया कशी राबवायची ? कोणत्या शाखेत मुलांना प्रवेश घेता येणार? यासह इतर अनेक प्रश्न मुलांसह पालकांना पडले आहेत. शासनाने ही संभ्रमावस्था दूर करावी, अशी मागणी होत आहे.



| जिल्ह्यात बारावीतील एकूण विद्यार्थी | | |
|---|---|---|
| ३१८१६ | मुले | १९१३७ |
| | मुली | १२६७९ |

## बारावीनंतरच्या संधी

- बारावीनंतर विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य आणि विज्ञान या पदव्यांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येतो. शहरी, ग्रामीण भागातही या पदव्यांची महाविद्यालये आहेत.
- बारावीनंतर फॅशन डिझायनिंग, नर्सिंग, पत्रकारिता, कायदा व अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी बारावीचे गुण विचारात घेतले जातात. त्यामुळे हा पर्याय आहे.
- बारावीनंतर कृषी, उद्योग, संशोधन, अभियांत्रिकी आदी विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन नोकरी आणि व्यवसायात काम करण्याची संधी निर्माण होते.
- या व्यतिरिक्त बारावीनंतर इतर विविध पदव्यांच्या अभ्यासक्रमासही विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार प्रवेश घेता येऊ शकतो.

## प्राचार्य म्हणतात...

कोरोनामुळे शिक्षणाचा बोजवारा उडाला आहे. भौतिक सुविधांअभावी अनेक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही. त्यामुळे बारावीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी घेतलेल्या परीक्षांसाठी विद्यार्थी सक्षम आहेत की नाही हा प्रश्न आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसमोर अडचणी राहणार आहेत.

\- डॉ. शिवशंकर घुमरे, प्राचार्य

बारावीनंतर विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतनच्या कोणत्याही शाखेत थेट द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. पदवीका झाल्यानंतर मुलांना खासगी कंपनीत नोकरी मिळू शकते. तसेच अभियांत्रिकीत द्वितीय वर्षात प्रवेश घेता येवू शकतो. पदवीनंतर व्यवसाय किंवा नोकरी हा पर्याय उपलब्ध होतो.

\- डॉ. ए. एम. जिंतूरकर,प्राचार्य

## विद्यार्थी म्हणतात...

बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. परंतु, गुण कसे मिळणार याची माहिती नाही. बारावी परीक्षेबाबत सर्व संभ्रम आहे. त्यामुळे पुढील प्रवेश कोणत्या शाखेत घ्यावा, याचाही निर्णय घेताना अडचणी येत आहेत.

\- मनीषा चव्हाण, विद्यार्थिनी

शासनाकडून बारावी परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. असे असले तरी प्रशासकीय पातळीवरून योग्य माहिती मिळत नाही. त्यामुळे पुढील प्रवेश प्रक्रियेबाबतही गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

\- चंद्रकांत खैरे, विद्यार्थी

## पालक म्हणतात...



कोरोनामुळे शिक्षणाचा पूर्णत: बोजवारा उडाला आहे. ऑनलाईन शिक्षणापासून अनेक मुलं वंचित राहिली आहेत. परीक्षा रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले. परंतु, गुणदानासह पुढील प्रवेशाबाबत अद्याप स्पष्टता नाही.

\- प्रभाकर सुरुंग, परतूर

कोरोनामुळे मुलांच्या शैक्षणिक जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. परीक्षा रद्द केल्याने गुणदानाबाबत त्वरित स्पष्टता शासनाने द्यावी. तसेच पुढील पदवीतील प्रवेश प्रक्रिया कशा होणार, हेही जाहीर करणे गरजेचे आहे.

-बद्रीनाथ बाबर, प्राचार्य